# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१
दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७
ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com

**महत्वाचे** जा.क्र.शिउसं/उमाशि-४०३/११वी प्रवेश/पुवि/२०१७/3552
दिनांक :- 31 MAY 2017

प्रति,

सर्व प्राचार्य,
उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र.

विषय :-**शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये इयत्ता १२ वी प्रवेशाबाबत**

**संदर्भ:-१) शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-२०१५/(६१/१५)एसडी-२ दि.२८.०३.२०१६**
**२) शासन निर्णय क्रमांक प्रवेश-२०१६/(१८०/१६)एसडी-२ दि.०७.१.२०१७.**
**३) मा.सहसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र जा.क्र. प्रवेश-२०१७/प्र.क्र.९१/एसडी-२ दि.३०.०५.२०१७.**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील इ. १२ वी मध्ये कनिष्ठ महाविद्यालये बदलुन देण्याची कार्यवाही कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर करण्यात यावी असे संदर्भ क्र-३ नुसार कळविलेले आहे. कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक विद्यालय बदलुन देण्याची कार्यवाही केवळ खालील नमुद कारणांसाठी करण्यात यावी.

१) सध्या विद्यार्थी शिक्षण घेत असलेले महाविद्यालय घरापासून लांब असणे.
२) पालकांची बदली होणे.
३) वैद्यकीय कारणास्तव राहत असलेल्या परिसरात कनिष्ठ महाविद्यालय बदलून मिळणे.
४) शाखा बदलुन मिळणे.
५) विद्यार्थ्यांचा राहण्याचा पत्ता बदलने.

उपरोक्त कारणांसाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज घेवून व आवश्यक त्या कागदपत्रांची पडताळणी करुन रिक्त जागांवर इ. १२ वी चे प्रवेश दिनांक ०१ जून २०१७ ते १५ जून २०१७ पर्यंत पूर्ण करण्यात यावेत. तसेच एकूण प्रवेश क्षमतेपेक्षा जादा प्रवेश करु नयेत.

विद्यार्थ्यांनी महाविद्यालय बदलल्यानंतर मागील वर्षी २०१६-१७ मधील ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर तयार झालेल्या डेटाबेस मध्ये यावर्षी कॉलेज बदलानंतरची माहिती दि. ३० जुन २०१७ पर्यंत अद्ययावत करावयाची आहे. याबाबतच्या सूचना व कार्यपध्दती शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून वेळोवेळी कळविण्यात येतील.

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या www.dydepune.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**
१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे
२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे